# अभिलेख दुरुस्ती

## CORRECTION IN RECORDS.

### विषय ओळख (About)

दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोदंणीस सादर करतांना, दस्तावर पृष्ठांकने/ शेरे नमुद करण्यात येतात तसेच मुळ दस्तावरुन सूची तयार केल्या जातात. सदरच्या कामकाजामध्ये कधीकधी काही त्रुटी व उणीवा राहतात. त्या त्रुटी व उणीवा दुरुस्त करणेकरीता नोंदणी कायदयात तरतुद आहे.

वरीलप्रमाणे चुका दुरुस्त करणेकामी दस्तातील संबधित पक्षकाराचा अर्ज आल्यास किंवा दुय्यम निबंधकास स्वत:हुन तशी चुक लक्षात आल्यास, तो नोंदणी अधिनियम,1908 चे कलम 68, नुसार, जिल्हा निबंधक यांना तसा दुरुस्तीसाठी प्रस्ताव पाठवू शकतो. प्रस्ताव उचीत असल्यास, जिल्हा निबंधक तसे दुरुस्तीचे आदेश पारीत केल्यानंतर, दुय्यम निबंधक अशा दस्ताचे मुळ अभिलेखात तशी दुरुस्ती करु शकतो. यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी < दस्त नोंदणी< इतर काही महत्वाच्या बाबी<सूचीमधील दुरुस्ती विशेष मुखत्यारपत्र पहावे.